## नियमित दिवाणी दावा क्र.४१/२०२० मधील अर्ज नि.क्र.९१ वरील आदेश

**CNR-MHSN-06000349-2020**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.९, ११, १९, २० व २४ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेबाबत विनंती केलेली आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादींच्या अर्जामधील कथन असे की, प्रतिवादींना दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर त्यांचे वकीलांचे मार्फत हजर झालेले आहेत. प्रस्तुत प्रतिवादी हे गोरगरिब असुन ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी, नोकरी, चाकरी करत आहेत. कोरोना महारोगाच्या पार्श्वभुमीवर शासनातर्फे जारी झालेल निर्बंधामुळे प्रतिवादींना वकीलांच्याकडे जावुन दावेकामी म्हणणे / कैफियत दाखल करण्यासाठी आवश्क असलेली माहिती व कागदपत्रे देता आले नाहीत . सदरचा विलंब हा त्यांनी जाणुनबुजून केलेला नाही. सबब त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दिले असुन जोरदार विरोध दर्शवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी हे दिनांक २४/०३/२०२१ रोजी हजर झालेले आहेत. कोरोना महामारीच्या अटी शिथिल झाल्यानंतर देखील सदर प्रतिवादी यांना मे. कोर्टात मुदतीत कैफियत दाखल करणेस अडचण नव्हती. दिनांक २८/०१/२०२२ रोजी विनाकैफियतीचा आदेश झाल्यानंतर प्रतिवादींनी वकीलांशी संपर्क साधुन विनाकैफियत विलंब माफ होणेसाठी अर्ज दिला आहे. सबब सदरचा अर्ज दहा हजार दंड आकारुन नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जामधील कथने प्रतिवादींनी शपथेवर सांगितलेली आहेत . प्रतिवादींची कैफियत दाखल करण्यास कोव्हीड-१९ या आजारामुळे वकीलांशी संपर्क साधुन योग्य ती माहिती देता आली नसल्यामुळे झालेला असल्याचे दिसते . दावा हा

वाटपाकरीता, कब्जाकरीता व हक्कज्ञापनाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर आल्यास वादीचे कसलेली नुकसान होणार नाही. प्रतिवादी यांनी अर्जात केलेले कथन हे संयुक्तिक वाटते . नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादींन एक संधी देणे योग्य व न्यायोचित होणारे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. ९, ११, १९, २० व २४ यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

मिरज. **( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )**

दि. ०७/०४/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav (L.G.) |
| Court. | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date. | : | 07/04/2022 |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 07/04/2022 |
| Order uploaded on. | : | 08/04/2022 |